## आदेश निशाणी क्रमांक १८ वर पारित

१) वादी यांनी प्रस्तुत अर्ज दावा दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे. वादीच्या म्हणण्या प्रमाणे सदरील दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी यांनी बेकायदेशीरपणे संगनमत करून प्रतिवादींच्या जमिनीपैकी ९ आर. क्षेत्राबाबत रंजना अन्ना साळवे यांच्या नावे बेकायदेशीर फेरफार मंजूर केलेला आहे. तसेच सदरील फेरफार नोंदीच्या आधारे रंजना साळवे यांनी सदरील ९ आर. शेत जमीन खोटया, बेकायदेशीर, विना ताबा व विना मोबदला खरेदीखता आधारे गजानन साहेबराव पुंगळे यांना बेकायदेशीरपणे हस्तांतरित केलेली आहे. त्यामुळे सदरील खरेदीखताचा दुरूपयोग करून गजानन पुंगळे व रंजना साळवे हे भविष्यात वादीस बेदखल करण्याची भिती निर्माण झालेली आहे.

२) तसेच प्रतिवादींची आई नामे– सिताबाई साळवे या देखील प्रस्तुत दाव्यात गुंतागुंत निर्माण करून अडथळा करण्यासाठी वादीस मानसिक त्रास देत आहे. त्यामुळे सदरील तीन्ही व्यक्तींना प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्रमांक ३ ते ५ म्हणून समाविष्ट करण्याची आवश्यकता आहे. तसचे वादीच्या मागणी प्रमाणे प्रस्तुत अर्जातील मजकूर दुरूस्ती अन्वये दाव्यात समाविष्ट करण्याची आवश्यकता आहे. वादीच्या म्हणण्या प्रमाणे सदरील दुरूस्ती केल्याने दाव्याच्या स्वरूपात कुठलाही बदल होणार नाही व प्रतिवादींचेही कुठलेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदरील

अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३) प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी खुलासा दाखल करून असे नमूद केले आहे की, वादी व प्रतिवादी यांच्या या पूर्वीच वाटण्या झाल्याचे व त्यांच्या जमिनी देखील स्वतंत्र असल्याचे वादीने दाव्यातील कथनात नमूद केलेले आहे. तसेच वादीने यापूर्वी देखील प्रतिवादी तसेच प्रतिवादींच्या आई व वडीलांच्या विरूध्द प्रस्तुत दाव्यातील मागणी प्रमाणे दिवाणी दावा क्रमांक ६४/२००२ दाखल केला होता व सदरील दाव्याचा यापूर्वी निर्णय झालेला आहे. परंतु वादीने सदरील पूर्वीच्या दाव्यातील चतुःसीमेचा बेकायदेशीरपणे वापर करून प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे. म्हणून सदरील अर्ज नामंजूर करण्याची मागणी प्रतिवादी यांनी केलेली आहे.

४) प्रस्तुतचा अर्ज, अभिलेखावर असलेले दस्त ऐवज यांचे अवलोकन केले. तसेच वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जात पुढील प्रमाणे वाद मुद्दे निश्चित होतात. त्यावर मी कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी हा मागणी प्रमाणे दावा दुरुस्ती करुन मिळण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २) | काय आदेश ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## ::कारणमिमांसा::

**मुद्दा क्रमांक १ करीता :–**

५) प्रस्तुतचा दावा वादी यांनी त्यांच्या मालकी व कब्ज्यातील दावा मिळकतीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करून नये म्हणून निरंतर मनाई हुकूमासाठी व सदरील दावा मिळकतीचा ताबा कायम ठेवून मालकी जाहीर करून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे व सदरील दावा आज रोजी निशाणी क्रमांक ५ च्या युक्तीवादासाठी प्रलंबित आहे. प्रस्तुत दाव्यातील वादीच्या वाद कथनांचे अवलोकन केले असता, वादी व प्रतिवादी हे आपसात चुलत भाऊ असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

६) तसेच मौजे लतीफपूर, ता.भोकरदन येथील शेत जमीन गट क्रमांक ४० मध्ये एकूण क्षेत्रफळ ८ एकर १४ गुंठे होते व त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांच्या वाटण्या झालेल्या असून त्यापैकी वादींच्या हिस्स्यास ४ एकर ७ गुंठे व प्रतिवादींच्या हिस्स्यास ४ एकर ७ गुंठे क्षेत्र मालकीने ताब्यात आल्याचे नमूद आहे. परंतु प्रतिवादी हे वादीच्या वाटणी हिस्स्याप्रमाणे आलेल्या क्षेत्रावर बेकायदेशीरपणे हरकत अडथळा करतात म्हणून त्यांच्याविरूध्द निरंतर मनाई हुकूमासाठी प्रस्तुतचा

दावा दाखल केलेला आहे.

७) असे की, सदरील दाव्यात वादीने मालकी हक्क जाहीर करून मिळण्याची मागणी केलेली असली तरी, सदरील दावा मिळकत वाटणी आधारे वादीच्या मालकी हक्काने ताब्यात असल्याचे त्यांचे कथन आहे व त्यास प्रतिवादींचा आक्षेप नाही. त्यामुळे सदरील दाव्यात वाद मिळकतीच्या हरकत अडथळयाबाबत दोन्ही पक्षकारांमध्ये वाद प्रश्न असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते.

८) याउलट प्रस्तुत अर्जातील वादीच्या मागणीचा विचार केला असता व त्या अनुषंगाने वादीने अभिलेखावर दाखल केलेल्या कथित खरेदीखत व ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता,दावा मिळकत शेत गट क्रमांक ४० चे एकूण क्षेत्रफळ ७/१२ उतारा प्रमाणे ३ हे. ३८ आर. नमूद आहे. त्यापैकी वादीच्या वाद कथना प्रमाणे वादी व प्रतिवादी यांना प्रत्येकी १ हे. ६९ आर. क्षेत्र वाटप झालेले आहे. सदरील वाटणीनुसार प्रतिवादी अन्ना साळवे, अ.पा.क आई सिताबाई यांच्या नावावरील १ हे. ६९ आर. क्षेत्रापैकी ९ आर. क्षेत्र त्यांनी महसूल फेरफार नोंद क्रमांक ३०१ अन्वये रंजना अन्ना साळवे म्हणजेच प्रतिवादी क्रमांक १ ची पत्नी यांच्या नावावर हस्तांतरित केलेली असल्याचे सदरील ७/१२ उता–यात नोंद आहे.

९) तसेच त्यानंतर सदर रंजना अन्ना साळवे यांनी सदरची ९ आर. जमीन

दिनांक १६/०३/२०२० रोजी नोंदणीकृत कायम खरेदीखत क्रमांक ११६९/२०२० अन्वये गजानन साहेबराव पुंगळे यांना हस्तांतरित केलेली असल्याचे सदरील खरेदीखताच्या प्रमाणित प्रतीवरून प्रथमदर्शी दिसून येते. म्हणजेच सदरील दस्त ऐवज हे दर्शविते की, प्रतिवादी यांनी त्यांना वाटणी प्रमाणे मालकी हक्काने मिळालेल्या १ हे. ६९ आर. जमिनीपैकी त्यांच्या मालकीची ९ आर. जमीन त्यांनी गजानन साहेबराव पुंगळे यांना विक्री केलेली आहे.

१०) म्हणजेच वादीच्या दावा मिळकतीच्या मालकी हक्कापैकी कुठलेही क्षेत्र सदरील व्यवहाराअन्वये हस्तांतरित झालेले नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत सदरील व्यवहाराचे लिहून देणार व लिहून घेणार नामे– रंजना अन्ना साळवे व गजानन साहेबराव पुंगळे या दोन्ही पक्षकारांस प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याची आवश्यकता आहे काय ? या प्रश्नाचा विचार केला असता, सदरील दावा हा वादीने वाद मिळकतीस हरकत अडथळा करू नये म्हणून मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. तसेच सदरील दावा मिळकतीची मालकी जाहीर होवून मिळण्यासाठी वादीची मागणी असली तरी सदरील दावा मिळकत मालकी हक्काने त्याच्या ताब्यात असल्याचे वादीचे वाद कथन आहे. त्यामुळे सदरील मागणी गुणवत्तेवर टिकेल काय ? हे पुराव्या नंतर सिध्द होईल. त्यामुळे आज रोजी तरी वादीची प्रमूख मागणी ही मनाई हुकूमाची असल्याचे दिसून येते.

**११)** म्हणजेच सदरील दाव्यात दावा मिळकतीच्या वादीच्या कब्जे उपभोगास प्रतिवादींनी हरकत अडथळा केला आहे काय ? हा सर्वात महत्वाचा वाद प्रश्न प्रस्तुत दाव्यात आहे. तसेच सदरील कथित खरेदीखताअन्वये वादीच्या मालकीचे कुठलेही क्षेत्र हस्तांतरित झाल्याचे वादीचे कथन नाही. त्यामुळे दाव्यातील मागणीचा विचार केला असता, कथित व्यवहाराचे लिहून देणार व लिहून घेणार हे दोन्ही व्यक्ती प्रस्तुत दाव्यातील वाद प्रश्न निकाली काढण्यासाठी आवश्यक पक्षकार नसल्याचेइ प्रथमदर्शी दिसून येते. तसेच वादी व प्रतिवादींमध्ये वाटपाबाबत व मालकी हक्काच्या क्षेत्राबाबत कुठलेही वाद नाही. त्यामुळे सदरील खरेदीखताबाबतचा मजकूर प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करण्याची आवश्यकता नसल्याचे या न्यायालयास प्रथमदर्शी वाटते.

**१२)** तसेच प्रतिवादींची आई नामे– सीताबाई यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करायचे का ? या प्रश्नाबाबत विचार केला असता, वादीचे त्याबाबत प्रस्तुत अर्जात कथन आहे की, सदरील सीताबाई ही दाव्यात गुंतागुंत निर्माण करून तीचा वादीला मानसिक त्रास सुरू आहे. म्हणून तीला पक्षकार करणे आवश्यक आहे. असे की, सदरील दावा हा दावा मिळकतीस हरकत अडथळा करू नये म्हणून दाखल केलेला आहे व सदरील सीताबाई यांनी दावा मिळकतीस हरकत अडथळा केल्याबाबत वादीचे कुठेही कथन नाही. त्यामुळे वादीस मानसिक त्रास

होत आहे, या कारणावरून सदरील सीताबाई यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करणे या न्यायालयास उचित व आवश्यक वाटत नाही.

**१३)** त्यामुळे एकंदरीत वरील सर्व कारणमीमांसेचा विचार केला असता, प्रस्तुतचा दावा हा मनाई हुकूमासाठी आहे व कथित व्यवहाराअन्वये प्रतिवादी यांनी त्यांच्या मालकीची जमीन हस्तांतरित केलेली आहे. त्यामुळे सदरील जमीन विक्री करणार व घेणार यांना या दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याची आवश्यकता नाही. तसेच सीताबाई यांना दाव्यात समाविष्ट करण्यासाठी दिलेले कारण हे संयुक्तिक नाही. एकंदरीत प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश १ नियम १०(२) व आदेश ६ नियम १७ च्या कक्षेत येत नाही. म्हणून **मुद्दा क्रमांक १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे**.

**मुद्दा क्रमांक २ करीता :–**

**१४)** मुद्दा क्रमांक २ च्या निष्कर्षासाठी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

स्वाक्षरित/–

(भरत सं. जगदाळे)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
भोकरदन.

ठिकाण :– भोकरदन
दिनांक :– ३०/०८/२०२१

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येत आहे की, पी.डी.एफ. संचिकेतील शब्द नि शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेकाचे नाव : – ए.आय.शेख
न्यायालयाचे नाव :– सह दिवाणी न्यायालय क.स्तर, भोकरदन
दिनांक :– ३०/०८/२०२१

स्वाक्षरित/–
लघुलेखक वर्ग–३